सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३०,३३,३४,४१, व कलम ५१
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
३) महाराष्ट्र शासन क्र. कोरोना२०२० प्र.क्र.५८/आरोग्य-५,दि. १४ मार्च २०२०
४) महाराष्ट्र शासन आदेश क्र.४०-३/२०२०-डी, दि. २४/३/२०२०.
५) महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर/९२/डीआयएसएम-१ दि.३१/५/२०२०.

---

क्र. जि.आ.व्य/कावि/ 1632/२०२०.
दिनांक :- 16 /०६/२०२०.

जिल्हाधिकारी पुणे

**विषय :- पुणे जिल्ह्यातील सेतू केंद्र, महा ई सेवा केंद्र, व आधार नोंदणी केंद्र सुरू करणेबाबत.**

आदेश

**ज्याअर्थी**, शासनाने कोरोना विषाणूचा ( कोव्हिड १९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३, व ४ मधील तरतुर्दीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. ज्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

**ज्याअर्थी**, सद्यस्थितीत कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग रोखणेकरिता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. तसेच वाचले क्र.५ अन्वये राज्यातीळ कोव्हीड-१९ च्या नियंत्रणाखाली लॉकडाऊन दिनांक ३० जून २०२० पर्यंत वाढविण्यात आला असून, विविध औद्योगिक व व्यवसायिक आस्थापना सुरू करणेस परवानगी देणेत आली आहे. त्यानुषंगाने सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार नोंदणी केंद्र शासनाकडील निर्देशाप्रमाणे सामाजिक अंतर राखून पुन्हा सुरू करणे आवश्यक आहे व तशी माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी, मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी पुणे, अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण तथा जिल्हाधिकारी, पुणे** वाचले क्र.१ ते ५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये पुणे जिल्ह्यातील प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) वगळून इतर क्षेत्रातील सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार नोंदणी केंद्र सामाजिक अंतर राखूनतसेच कोरोना रोखण्याबाबतच्या सर्व उपाययोजनांची अंमलबजावणीस बांधील राहून सुरू करणेत येत आहेत.

**सेतू केंद्र व महा ई सेवा केंद्रामध्ये घ्यावयाची खबरदारी :-**

१) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार नोंदणी केंद्रातील साम्रगी/उपकरणे व परिसराचे निर्जंतुकीकरण करून घेणे आवश्यक आहे.

२) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार केंद्रातील केंद्र चालक व इतर ऑपरेटर यांनी स्वच्छता विषयक सर्व निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे. उदा. वारंवार सावणाने हात धुणे, सॅनिटायझर वापरणे इत्यादी.

३) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार केंद्रामध्ये काम करताना ऑपरेटर नाक, तोंड, व डोळ्यांना स्पर्श होणार नाही याची दक्षता घेतील.

Scanned by CamScanner

४) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार केंद्रातील ऑपरेटर व येणा-या नागरिकांनी पूर्णवेळ तोंडाला मास्क वापरावा. केवळ फोटो काढणेच्या वेळेस मास्क काढणेस परवानगी देणेत यावी.

५) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार केंद्रात येणा-या नागरिकांनी वैयक्तीक स्वच्छतेचे पालन केले पाहिजे.

६) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार केंद्र व्यवस्थापक टेबल/ ऑपरेटर स्थानकांदरम्यान शारीरीक अंतर ( किमान ६ फूट ) सुनिश्चित करण्याचे आहे. जास्त गर्दी टाळण्यासाठी सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार केंद्रामध्ये अपॉईंटमेंटशिवाय येण्याची नागरीकांना परवानगी दिली जाऊ नये.

७) नागरीकांना सामाजिक अंतर निश्चित करण्यासाठी योग्य अंतरासह जेथे उपयुक्त असेल तेथे मोकळ्या हवेत बसण्यास प्रोत्साहित करावे.

८) नागरिकांना किंवा कर्मचा-यांना खोकला, ताप व कफ, श्वासोच्छवासाच्या अडचणी इत्यादीसारखे लक्षणे आढळल्यास त्यांनी सेतू केंद्र, महा-ई सेवा केंद्र व आधार केंद्रात न येणेबाबत फलक लावावेत.

९) प्रत्येक सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, व आधार नोंदणी केंद्र युआयडीएआयने पुरविलेल्या टेम्पलेटनुसार नागरीकांसाठी पत्रक दर्शनी भागात लावावेत.

१०) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, व आधार नोंदणी केंद्र ऑपरेटरनी कोव्हीड-१९ च्या Hotspot ला जाणे किंवा अशा भागातून प्रवास करणेस सक्त मनाई राहिल.

११) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) यामधील गावे व भागात सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधार नोंदणी केंद्र सुरू करणेत येऊ नयेत.

१२) जिल्ह्यामध्ये सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, व आधार नोंदणी केंद्रात शिबीरे घेऊ नयेत.

१३) सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, व आधार नोंदणी केंद्रात येणा-या प्रत्येक व्यक्तीचे थर्मल स्कॅनिंग करावे व त्याची दैनंदिन नोंद ठेवावी.

वरिल नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आलेस आपणांवर उपरोक्त आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती अथवा संस्था शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करणेत येईल.

तरी उपरोक्त निर्देशानुसार सर्व संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करणेत यावी. त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रत:-** १. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
२. आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे माहितीस्तव
३. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड .
४. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेकडे माहितीस्तव
६. उपविभागीय अधिकारी व तहसिलदार सर्व यांना पुढिल कार्यवाहीसाठी
७. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी

Scanned by CamScanner